# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २०, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण,क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३) पर्यावरण मंत्री** | |
| **(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५७**

---

## नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील दिलकॅप इंजिनियरिंग कॉलेजने अवैध शिक्षक कार्यरत असल्याचे दर्शवून मान्यता मिळविल्याबाबत

**(१) * ९९८२४ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील दिलकॅप इंजिनियरिंग कॉलेजने एआयसीटीई, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई विद्यापीठ आणि शुल्क नियंत्रण प्राधिकरणाला माहिती सादर करताना ४० अवैध शिक्षक कार्यरत असल्याचे दर्शवून मान्यता मिळविल्याबाबतची तक्रार सिटीझन फोरमने प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इंजिनियरिंग कॉलेजमधील कर्मचाऱ्यांचा प्रॉव्हिडंट फंड कॉलेजकडून भरला जात नसणे, यासंदर्भात कोणाचेही खाते उघडलेले नसणे,

पेपर तपासणी करणाऱ्या शिक्षकांना मानधन न देणे, अवैध शिक्षक दर्शविणे तसेच अवैधरित्या केलेली फी वाढ या सर्व प्रकरणी कॉलेजचे संस्थापक व प्राचार्य यांच्यावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैधरित्या शिक्षकांची संख्या दर्शवून मान्यता घेणाऱ्या शिक्षण संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) याबाबत सिटीझन फोरम फॉर सॅन्क्टीटी इन एज्युकेशनल सिस्टीम या संघटनेने केलेली तक्रार संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मुंबई विद्यापीठ, मुंबई व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात आली आहे. या प्रकरणी संचालक, तंत्र शिक्षण, शुल्क नियामक प्राधिकरण व मुंबई विद्यापीठ यांच्याकडून चौकशी सुरु आहे.

या प्रकरणी विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडून चौकशी अहवाल संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडे प्राप्त झाला असून संचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावर चौकशी अहवालाची छाननी सुरु आहे .

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडहिंग्लज व चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील धोकादायक असलेल्या प्राथमिक शाळाखोल्यांची दुरुस्ती करणेबाबत

**(२) * ९६७०७ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज व चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अनेक प्राथमिक शाळांच्या खोल्या अत्यंत धोकादायक असल्याने विद्यार्थ्यांना पर्यायी व्यवस्था म्हणून समाजमंदिर, ग्रामपंचायत अथवा खाजगी खोल्यांमध्ये शिक्षणाकरिता बसविले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच चंदगड तालुक्यातील इसापूर या डोंगराळ व अतिदुर्गम भागातील लोकांनी लोकवर्गणीतून १९७३ मध्ये बांधलेल्या शाळाखोल्यांची इमारत माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे कोसळल्याने शाळेचे वर्ग गावातील एका घराच्या ओसरीवर भरविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शाळेची इमारत शासन निधीतून बांधून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) सर्व शिक्षा अभियानाच्या वार्षिक कार्ययोजना सन २०१८-१९ मध्ये संबंधित कामाच्या अंतर्भावासाठीची तजविज ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध गावांतील व जिल्हा परिषदेच्या २१६ शाळांच्या दुरुस्तीबाबत

**(३) * ९६८४९ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध गावांतील शाळाखोल्या धोकादायक बनल्या असल्याचे तसेच उक्त जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१६ शाळांची दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे असूनही शासनाकडून निधी मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात अनेक ठिकाणी शाळांमधील वर्गखोल्यांच्या भिंतींना तडे गेले असल्याने या भिंती कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे तसेच अनेक शाळांना दरवाजे व खिडक्या नसल्यामुळे वर्गामध्ये जनावरे जात असल्याने व पावसाळयात वर्गाचे पत्रे फुटल्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने निधीची तरतूद करुन उक्त वर्गखोल्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

कळमनुरी तालुक्यातील ४९ वर्गखोल्या धोकादायक असून हिंगोली जिल्हयातील २११ शाळांना दुरूस्ती आवश्यक आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

सर्व शिक्षा अभियानांतर्गत व जिल्हा परिषद सेस फंडातून ३ शाळांमधील ६ वर्गखोल्यांकरिता सन २०१७-१८ मध्ये दुरूस्तीसाठी निधी मंजूर आहे. तसेच मोडकळीस येऊन धोकादायक झालेल्या २३ शाळांपैकी ५ शाळांमधील १० वर्गखोल्या पाडून नवीन वर्ग खोल्या बांधकामाकरिता सर्व शिक्षा अभियानांतर्गत निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील किल्ल्याची दुरुस्ती करून अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(४) * ९५१९८ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील ऐतिहासिक वसई किल्ल्याची अत्यंत दुरवस्था झाली असून किल्ल्याच्या दुरूस्तीकरिता वसई परिवाराने पुरातत्व विभागाकडे अनेक वेळा लेखी निवेदनासह मागणी करुन देखील दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त ऐतिहासिक किल्ल्यात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत असून अनधिकृत बांधकामामध्ये भाडेकरु ठेवण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त किल्ल्याच्या दुरूस्तीकरिता व किल्ल्यावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याकरिता कोणती कार्यवाही केली व किल्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

तथापि सदरचा किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक असल्याने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडलाकडे अन्य संस्थेने वसई किल्ल्यावरील सुरक्षेबाबत पत्रव्यवहार केल्याचे अधीक्षण पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल, मुंबई मंडल, मुंबई यांनी कळविले आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिनविरा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील वाढीव प्रादेशिक नळपाणी पुरवठयाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(५) * ९६३५६ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिनविरा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत वाढीव प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेची प्रमुख कामे अपूर्ण असताना ठेकेदाराला ३ कोटी ९५ लाख ९६ हजार रुपयांपैकी सुमारे पावणे तीन कोटी रुपयांची देयके अदा करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेची मूळ कामे अपूर्ण असून उक्त योजना पूर्ण झाली असल्याची खोटी नोंद केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उक्त योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

तिनवीरा, ता.अलिबाग, जि.रायगड योजनेची अंदाजपत्रकीय ढोबळ मंजूर किंमत रु.३,४३,९५,५३८/- इतकी असून, सदर योजनेचे कामाकरिता समितीस आजपर्यत रक्कम रु.२,५५,५९,९८५/- इतका निधी वर्ग करण्यात आला आहे. योजनेची कामे प्रगतीपथावर असून, योजनेतील समाविष्ट गावांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(२) योजनेतून समाविष्ट गावांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आल्याने केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर नोंद करण्यात आली आहे.

(३) व (४) मध्यंतरी वाळू उपसावर बंदी असल्याने वाळू उपलब्ध होऊ न शकल्याने योजनेतील MBR/ESR व SUMP या उपांगाची कामे वेळेत होऊ शकली नाहीत. योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत उप अभियंता मार्फत वेळोवेळी समितीस सूचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत योजनेतून पाणी पुरवठा सुरु असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षण विभागाच्या सरल संगणक प्रणालीमध्ये माहिती नोंद करण्याचे काम शिक्षकांवर सोपविल्याबाबत

**(६) * ९५०८४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुभाष पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली (पूर्व)), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा याची माहिती एकाच पटलावर नोंदविण्याच्या उद्देशाने शिक्षण विभागाने सरल या संगणक प्रणालीमध्ये माहिती भरून घेण्याचे काम शिक्षकांवर सोपविले असून प्रतिवर्षी ३० सप्टेंबर पर्यंत सरल प्रणालीत नोंद असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शाळांची संच मान्यता निश्चित करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या सन २०१७ च्या नवीन आदेशानुसार विद्यार्थ्यांच्या माहितीसोबत आधार क्रमांकांची नोंदणी करणे शाळांना अनिवार्य करण्यात आले असून "सरल" यंत्रणेत जितक्या विद्यार्थ्यांची आधारकार्ड अपलोड करण्यात आलेली आहेत, तितकेच विद्यार्थी संच मान्यतेसाठी ग्राह्य धरले जाणार आहेत, तर ज्या विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक नोंदविले जाणार नाहीत, त्या विद्यार्थ्यांना संच मान्यतेसाठी गणले जाणार नसल्याचे शिक्षण संचालनालयाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास शाळांना पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांची माहिती भरताना संकेतस्थळाची गती अत्यंत संथ असणे अथवा संकेतस्थळ बंद असणे, वंजारी जात ही एनटी डी ऐवजी एनटी बीमध्ये समाविष्ट झाली असणे, पालकांकडून बचत खात्याची माहिती प्राप्त न होणे, परराज्यात जन्मलेल्या विद्यार्थांची नावे नोंदविण्यास अडचण येणे, सगळे रकाने भरल्याशिवाय माहिती जतन न होणे, पालकांकडून अपंग विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती उपलब्ध न होणे अशा अनेक अडचणी उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शिक्षकांना त्यांच्या तासिकेवर जायला विलंब होत असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अद्यापपर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी आपले आधारकार्ड शाळांकडे सादर केलेले नाही व जी आधारकार्ड प्राप्त झाली आहेत त्यांची माहिती “सरल” प्रणाली मध्ये अपलोड होत नाही तसेच राज्यातील जवळपास ४८ लाख विद्यार्थ्यांची आधार नोंदणी शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर निर्णयाचा मुंबईतील अनेक शाळांवर परिणाम होणार असल्याने मोठ्या प्रमाणावर शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे यामुळे

आधारकार्डची सक्ती रद्द करावी अशी मागणी मुंबई माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेने मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शिक्षकांना येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सरल प्रणालीतील माहिती भरण्याकरिता एक अतिरिक्त पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) अंशत: खरे आहे.
(६) होय.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील लिंगायत समाजाला संवैधानिक मान्यतेसह अल्पसंख्याकाचा दर्जा मिळण्याबाबत

**(७) * ९५८१८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लिंगायत समाजाला संवैधानिक मान्यता व अल्पसंख्याकाचा दर्जा मिळावा या प्रमुख मागणीसह इतर अन्य मागण्याबाबत राज्यातील लिंगायत समाजाने दिनांक ३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लातूर येथे महामोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिंगायत समाजाने कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व तद्नुसार उक्त मागण्यांसंदर्भात कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) लिंगायत समाजाने खालील मागण्या केल्या आहेत-

१) लिंगायत समाजाला संवैंधानिक मान्यता प्रदान करावी.

२) लिंगायत धर्मियांना धार्मिक अल्पसंख्याक वर्गामध्ये समाविष्ट करावे.

३) राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर महात्मा बसवेश्वर आर्थिक महामंडळ स्थापन करावे.

४) २०२१ मध्ये होणाऱ्या भारतीय राष्ट्रीय जनगणनेत लिंगायत धर्माच्या लोकसंख्येची स्वतंत्र नोंद होण्यासाठी सरकारने लोकसंख्या पारपत्रामध्ये विशिष्ट स्वरुपात नोंदीची व्यवस्था करावी.

५) लिंगायत धर्माच्या मुळ कन्नड भाषेतील वचन साहित्याला मराठीसह इतर भारतीय भाष्यामध्ये अनुवाद करण्यासाठी शासनाने स्वतंत्र मंडळाची किंवा प्रकल्पाची निर्मिती करावी.

(३) विभागाने दि.२१.०७.२०१४ रोजीच्या पत्रान्वये लिंगायत समाजाला अल्पसंख्याक दर्जा देण्यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या अहवालाची माहिती अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून मागितली होती. त्यांनी राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे दि.१३.०५.२०१४ रोजीचे अभिप्राय राज्य शासनास पाठविले आहेत व त्यामध्ये लिंगायत हा स्वतंत्र धर्म नसून हिंदू धर्माचा एक पंथ असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सन २०११ च्या जनगणनेमध्ये लिंगायत समाजासाठी स्वतंत्र नोंद घेण्यात आलेली नाही. सबब, लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा व अल्पसंख्याक दर्जा देणे अनुज्ञेय नाही. तसेच इतर मागण्यांबाबत तपासून संबंधित विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील क्रीडा संकुलाची झालेली दुरवस्था

**(८) * ९९००८ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या क्रीडा संकुलाची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्रीडा संकुलात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असून ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग तसेच दगड पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संकुलामध्ये कबड्डी, हॉलीबॉल तसेच फुटबॉलचे क्रीडांगण करण्याचे मंजुर झालेले काम अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू क्रीडा संकुलाची दुरुस्ती व मैदानाची कामे करून उक्त क्रीडा संकुल खेळाडूंना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अंशतः खरे आहे.

सन २०१५-१६ मध्ये जिल्हा वार्षिक योजने मधुन तालुका क्रीडा संकुलासाठी क्रीडांगण समपातळीसाठी रु.७.०० लक्ष रुपये निधी मंजुर झालेले असून क्रीडांगण समपातळीत करण्याचे काम पुर्ण झाले आहे, परंतु, पुर्णत्वाचा दाखला सा.बा.विभागाकडुन प्राप्त झालेला नाही. सदर क्रीडांगणावर फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, क्रीकेट, पोलीस भरती, सैन्य भरतीचे मुले/मुली नियमित सराव करत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मुरुड (जि.लातूर) गावास मांजरा प्रकल्पातून पाणीपुरवठा योजना सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत

**(९) * ९९१८५ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (ता.जि.लातूर) या गावास मांजरा प्रकल्पातून पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव गत तीन वर्षापासून प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास तांत्रिक व तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रस्तावास सुधारित तांत्रिक मान्यतेसह मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक ५ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये योजनेच्या दरडोई खर्चाच्या अंदाजपत्रकास व आराखडयास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे यांच्या दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. तद्नंतर दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

(३) दरम्यानच्या कालावधीत केंद्र शासनाच्या दिनांक २९ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नवीन पाणी पुरवठा योजना काही बाबी वगळता नवीन योजनांच्या समावेशास स्थगीती देण्यात आली त्यामुळे मुरुड पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली नाही.

सध्या लातूर जिल्हयाच्या सन २०१७-१८ च्या कृती आराखडयात सदर वाढीव मुरुड पाणी पुरवठा योजनेचा समावेश करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## धामणा व नविन धामणा (जि.अकोला) गावाला टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेबाबत

**(१०) * ९८८२५ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) तालुक्यात अत्यल्प पाऊस झाल्यामुळे धामणा व नविन धामणा गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पूर्णा नदीच्या पाण्याला दुर्गंधीयुक्त वास येत असल्यामुळे गावातील नागरिकांना टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्णा नदीचे पात्र कोरडे पडल्याने पाणी दुर्गंधीयुक्त झाल्यामुळे उक्त गावांमध्ये रोगराई पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व तद्‍नुसार धामणा व नविन धामणा गावाला टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यासाठी व गावांतील रोगराई दूर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) धामणा व नविन धामणा गावातील नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली होती हे खरे आहे, तथापि, पूर्णा नदीचे पात्र कोरडे पडल्याने पाणी दुर्गंधी युक्त झाल्याने उक्त गावांमध्ये रोगराई पसरली आहे, हे खरे नाही.
(३) धामणा व नविन धामणा गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे टँकरद्‍वारे शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

तसेच, पूर्णा नदीचे पाणी अस्वच्छ झाल्याने ते पिण्याकरिता वापरू नये याबाबत आरोग्य विभागामार्फत जनजागृती करण्यात आली आहे. त्याचबरोबर सर्वेक्षण करुन रोगप्रतिबधंक व उपचारात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भातील १२ जिल्ह्यामधील संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान विजेत्या ग्रामपंचायतींना बक्षिसाची रक्कम अदा करणेबाबत

**(११) * ९६५४२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अजिसपुर (ता.जि.बुलढाणा) या ग्रामपंचायतीचा संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानात सन २०१६-१७ मध्ये जिल्हयातून प्रथम क्रमांक आला असुन त्या बाबतच्या बक्षिसांची रक्कम अद्यापही शासनाने अदा केली नसल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भातील १२ जिल्ह्यामधील सदर अभियानात विजेत्या ग्रामपंचायतींना सुध्दा उक्त बक्षिसांची रक्कम वितरीत केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त ग्रामपंचायतींना बक्षिसांची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०१६-१७ अंतर्गत बुलढाणा जिल्हास्तरावर पंचायत समिती बुलढाणामधील अजिसपूर या ग्रामपंचायतीला

द्‌वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झालेले असून यापोटी मिळणारी बक्षिसाची रक्कम रू.३,००,०००/- दिनांक १४/०८/२०१७ रोजी वितरीत करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हयातील शिक्षण विभागात झालेला गैरव्यवहार

**(१२) * ९५१९३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील शिक्षक भरती गैरव्यवहारात सन २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीत शिक्षण विभागात एकूण २६२ अवैध तुकडया तर ३६९ शिक्षकांची भरती प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाणे, लातूर, अधिकारी, संस्थाचालक,मुख्याध्यापक यांचे विरुध्द माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमबाहय तुकडया मंजूर करणे आणि शिक्षकांची नियमबाहय नेमणूक करणे यामध्ये शासनाची ६ कोटी ९८ लाख ९७ हजार ९९० रूपयांची फसवणूक करण्यात आली असून यातून संच मान्यता मिळविण्यासाठी मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची लातूर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असली तरी याबाबतचा तपास धिम्या गतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राधानगरी व पन्हाळा (जि.कोल्हापुर) तालुक्यातील ४० शाळां बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(१३) * ९५६३५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी व पन्हाळा (जि.कोल्हापुर) तालुक्यातील २० पटसंख्येखालील ४० शाळा राज्य शासनाच्या बंद करण्याच्या निर्णयामुळे बंद करण्यात येणार असल्याने तसेच शिक्षकांचे समायोजन व त्या शाळांतील विद्यार्थ्यांना सोईनुसार इतरत्र हालविण्याच्या निर्णयाबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळा बंद झाल्यास येथील विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेपर्यंत ५ ते १५ किमी पर्यंतचे अंतर पार करून जावे लागणार असून याकरीता दळणवळणाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची गळती वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून उक्त निर्णयामुळे तालुक्यातील

अतिदुर्गम व डोंगर, दऱ्या-खोऱ्यांमध्ये असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोईपासून वंचित व्हावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने आर.टी.ई. २००९ च्या कायद्याप्रमाणे सर्वांना मोफत व सक्तीच्या शिक्षणान्वये ६ ते १४ वयोगटातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच २० पटाखालील शाळा बंद करण्यात येवू नये याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती मध्ये झालेला गैरव्यवहार

**(१४) * ९५५५४ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ हजार महाविद्यालयांना केंद्र शासनाद्वारे सन २०१० ते २०१५ या कालावधीत उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिष्यवृत्ती मध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबतची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष चौकशी आयोगाचा (एस.आय.टी.) अहवाल प्राप्त झाल्यानंतरही शासनाने संबंधित महाविद्यालयांविरुध्द गुन्हा दाखल केलेला नाही अथवा गुन्हे दाखल करण्याचे निदेश दिलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालानुसार कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित महाविद्यालयांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच भविष्यात राज्य व केंद्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार होऊ नयेत व सदरची प्रक्रिया पारदर्शकरितीने पार पडावी यासाठी शासन कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अशंतः खरे आहे.
(२) हे खरे नाही, विशेष चौकशी पथकाच्या अहवालानुसार अनियमितता गैरव्यवहार केल्या प्रकरणी संबंधित शैक्षणिक संस्थांविरुध्द गुन्हे दाखल करण्यास व वसुलपात्र रक्कम वसुल करण्यास आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत संबंधित जिल्हयांच्या सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना कळविण्यात आले आहे.
(३) तथापि, संबंधित संस्थांनी दाखल केलेल्या रिट याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद व नागपूर खंडपिठाने दिलेल्या स्थगिती आदेशानुसार संबंधित संस्थांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. मात्र, शैक्षणिक संस्थाकडून वसुलपात्र रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही संबंधित सहायक आयुक्तांमार्फत सुरु आहे.

शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार होऊ नयेत व सदरची प्रक्रिया पारदर्शकरितीने पार पाडावी यासाठी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षा पासून माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने महा डिबीटी पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. या प्रणाली मार्फत शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी व निर्वाह भत्ता इ. लाभ विद्यार्थ्यांच्या आधारलिंक बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडगाव बुद्रुक (जि.पुणे) येथील गोयल गंगा डेव्हलपर्स बांधकाम प्रकल्पात पर्यावरण नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(१५) * ९५९९५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव बुद्रुक (जि.पुणे) येथील गोयल गंगा डेव्हलपर्स बांधकाम प्रकल्पात पर्यावरण नियमांचे उल्लंघन झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सदरचे प्रकल्पात पर्यावरणास घातक कामे होत असल्याने प्रकल्पाचे बांधकामांना स्थगिती चे आदेश दिले असतांना प्रकल्प धारकाने बांधकाम सुरु ठेवले आणि त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचे आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने बांधकाम सुरु राहिल्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गोयल गंगा डेव्हलपर्स बांधकाम प्रकल्पात पर्यावरण नियमांचे उल्लंघन होत असतांना त्याकडे दुर्लक्ष करणारे संबंधित अधिकारी आणि प्रकल्पधारकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरासंगम व तीन गावाच्या राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गतच्या पाणी पुरवठा योजनेमध्ये झालेला गैरप्रकार

**(१६) * ९७२७२ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरासंगम व तीन गावांच्या राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईन कामामध्ये झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याच्या मागणीकरिता दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास श्री.अरूण श्रीपती चव्हाण यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा यांच्या सूचनेनुसार उप अभियंता जि.प.ल.पा उपविभाग नेवासा यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार सदर चौकशी उप अभियंता, जि.प.ल.पा. उपविभाग, नेवासा यांचेमार्फत पुर्ण करण्यात आली. सदर चौकशी अहवाल कार्यकारी अभियंता, ग्रा पा.पु.वि. जि.प. अहमदनगर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणे व पुणे या जिल्ह्यांसह राज्यातील विविध शहरातील पेट्रोल पंपावर टाकलेले छापे

**(१७) * ९५०७६ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे**

**(भोर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे व पुणे या जिल्हयांसह राज्यातील विविध शहरातील पेट्रोल पंपावर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वैद्यमापन शास्त्र विभागाने तसेच पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात पेट्रोल भरणाऱ्या यंत्रामध्ये फेरफार करुन ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी एकूण ८२ पेट्रोल पंपाविरुध्द माहे जुलै,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पेट्रोल पंपाचे परवाना व त्यांना होत असलेला इंधन पुरवठा तातडीने रद्द करणेबाबत केंद्र शासनाच्या पेट्रोलियम मंत्रालयाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर वैद्यमापन विभागातर्फे कारवाई करण्यास विलंब होत आहे व पेट्रोल पंपांची तपासणी दरमहा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार इंधन चोरी करणाऱ्या पेट्रोल पंप व्यवसायिकांचे परवाने रद्द करण्याबाबत व तपासणी करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) याबाबत गृह विभागाने पेट्रोलियम कंपन्यांना कळविले आहे.

(३)पेट्रोल/डिझेल पंपाची नियतकालिक पडताळणी व मुद्रांकन वर्षातून एकदा करणे आवश्यक असल्याने त्यानुसार वैधमापन शास्त्र विभागाकडून कार्यवाही करण्यात येते.

(४) दि.१८.०५.२०१७ ते दि.२७.०५.२०१७ या कालावधीत तेल उत्पादक कंपन्यांच्या अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली राज्यामध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली असून त्यामध्ये १४५ पेट्रोलपंप आस्थापना तपासल्या असता पेट्रोलचे ४ नोझल्स व

डिझेलचे २ नोझल्स कमी वितरण करीत असल्याचे, ६ आस्थापनांमध्ये साठ्यामध्ये तफावत आढळली असून ७ आस्थापनांची विक्री बंद केल्याचे राज्यस्तरीय समन्वयक, तेल उत्पादक कंपन्या यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अंत्योदय अन्न योजनेबाबत काढलेल्या आदेशाबाबत

**(१८) * ९५७३६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंत्योदय योजनेतील एक किंवा दोन सदस्य संख्या असलेल्या कुटूंबाची शिधापत्रिका शासनाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास

रद्द करुन त्यांना प्राधान्य गटात समाविष्ट करण्यात आले असून पाच माणसांपेक्षा जास्त सदस्य संख्या असलेल्या प्राधान्य गटातील कुटूंबाची शिधापत्रिका रद्द करुन त्यांना अंत्योदय योजनेत समाविष्ट करण्याचे निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशामुळे गरजू, विधवा, निराधार, परित्यक्त्या, दोन अपत्य असणाऱ्या महिला अशा सुमारे एक कोटी ७७ लाख लाभार्थी धान्यापासून वंचित झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अन्न सुरक्षा कायद्याची चुकीच्या पध्दतीने अंमलबजावणी होत असून ग्रामीण भागात ४४ हजार व शहरी भागात ५९ हजार रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या म्हणजे ग्रामीण भागात प्रतिदिन १२२ रुपये तर शहरी भागात प्रतिदिन सुमारे १६६ रुपये उत्पन्न असणाऱ्या कुटूंबाला रेशन व्यवस्थेत सामावून घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना दर महिन्याला २ रु. किलोप्रमाणे २१ किलो गहू व ३ रुपये प्रति किलो प्रमाणे १४ किलो तांदूळ असे एकूण ३५ किलो धान्य देण्यात येत होते आता ३५ किलो ऐवजी प्रत्येक व्यक्तीला दरमहा केवळ ५ किलो धान्य देण्यात येणार असून अंत्योदय योजनेच्या प्रति कुटूंबास महिन्याला फक्त १ किलो साखर देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त आदेशाच्या निषेधार्थ राज्यात माहे सप्टेंबर, ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ठिकठिकाणी आंदोलने व निदर्शने करण्यात आली असून रायगड जिल्हयात दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त आदेश रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शहरी व ग्रामीण भागासाठी दिलेल्या इष्टांकाच्या मर्यादेच्या अनुषंगाने लाभार्थ्यांचे समावेशन करण्याकरिता दि. १७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये कमाल उत्पन्नाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

(४) होय.

(५) होय.

(६) अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिका वर्ग करण्याबाबत शासनाने केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत व त्यामागील शासनाचे धोरण निवेदनकर्त्यांना कळविण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आर.सी.एफ. कंपनीतून समुद्रात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याची पाईप लाईन वर आल्याने मच्छीमार नौकांना निर्माण झालेला धोका

**(१९) * ९७१६७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आर.सी.एफ. कंपनी गत ३० ते ३५ वर्षांपासून कार्यरत असून सदर कंपनीचे सांडपाणी पाईपलाईन द्वारे थळ खाडीच्या चॅनेलमधून समुद्रात सोडले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कपंनीचे सांडपाणी वाहून नेणारी पाईप लाईन गत अनेक वर्षांपासून नादुरूस्त झालेली असून खाडीची धूप झाल्याने सदर पाईप वर आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाईप लाईन समुद्राच्या वर आल्यामुळे खाडीतून ये-जा करते वेळेस मच्छिमार नौका त्यावरआदळत असल्याने नौकांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मच्छिमार संघटनेनी अनेक वेळा जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या असून सदर कपंनीवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) खाडीची धूप/झीज झाल्याने प्रक्रियाकृत सांडपाणी वाहून नेणाऱ्या नलिकेचा पृष्ठभाग ओहोटीच्या काळात उघडा पडल्यामुळे दिनांक २४.०५.२०१७ रोजी कृपा माऊली ही नौका पाईपलाईनवर आदळून अपघात झाला. या अनुषंगाने जिल्हाधिकारी,रायगड यांनी व्यवस्थापक, मे.आर. सी. एफ.लि, थळ यांना दिनांक १६.०६.२०१७ रोजी नुकसान भरपाई देणेबाबत नियमोचित कारवाई करावी असे आदेश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील ४१ गावातील पिण्याचे पाणी दूषित आढळल्याबाबत

**(२०) * ९५५७१ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील ४१ गावांतील पाणी दूषित असल्याचे तालुक्यातील दर महिन्याला होणाऱ्या तपासणीत आढळून आल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यात दुषित पाणी प्यायल्यामुळे  कावीळ, अतिसार, जुलाब या रोगांची लागण झालेल्या रुग्णांची संख्या वाढली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास ,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने तालुक्यातील गावांना कायमस्वरूपी स्वच्छ व शुध्द पाणी मिळण्याकरिता कोणती  कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अमरावती यांच्या अहवालानुसार धामणगाव रेल्वे तालुक्यामध्ये एकूण ६२ ग्रामपंचायती असून ८५ गावे आहेत. सदर गावांतर्गत एकूण ६५४ स्त्रोत आहेत.माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये एकूण १५८ व माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये एकूण ११९ पाणी नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते, त्यापैकी माहे सप्टेंबर व ऑक्टोबर मध्ये अनुक्रमे १८ व ४ पाणी नमुने दूषित आढळून आले आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अमरावती यांच्या अहवालानुसार धामणगाव रेल्वे तालुक्यामध्ये दूषित पाणी प्यायल्यामुळे काविळ, अतिसार, जुलाब या रोगांची लागण झालेल्या रूग्णांची संख्या निरंक आहे. दूषित पाणी स्त्रोतांचे पुन्हा निर्जंतूकीकरण करण्यात येऊन त्याची फेर तपासणी करण्यात आली असता ते पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहेत. सर्व गावांना शुद्ध पाणी मिळण्याकरिता सर्व ग्रामपंचायतींमध्ये ब्लिचिंग पावडर उपलब्ध ठेवून त्याचा पाणी शुद्धीकरणासाठी नियमीत वापर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे विभागातील अनुदानित महाविद्‌यालयांकडे शासनाची रक्कम अखर्चित असल्याबाबत

**(२१) * १००४५२ श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागातील अनुदानित महाविद्‌यालयांना शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनुदानापोटी दिलेल्या रकमांची अनुदान निश्चिती न झाल्याने शासनाचे सुमारे ५० कोटी रुपये १५ वर्षांपासून महाविद्‌यालयांकडे अखर्चित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुणे विभागातील अनुदानित महाविद्यालयांची अनुदान निश्चिती करून अनुदानापोटी दिलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) पुणे विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या अनुदान निर्धारणामध्ये वेतनापोटी रु.५.७५ कोटी इतकी रक्कम वसूलपात्र असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर वेतन अनुदानाची वसूलपात्र रक्कम ही वेतनेत्तर अनुदानापोटी देय असलेली रक्कम निर्धारीत झाल्यानंतर ती रक्कम समायोजित करुन निव्वळ वसूलपात्र रक्कम संबंधित महाविद्यालयांकडून वसूल करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे. अनुदान निर्धारणाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील ११५ गावांचे जलस्त्रोत दूषित असल्यामुळे गावांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(२२) * ९५८९० श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील ११५ गावांचे जलस्त्रोत दूषित असून शुध्द पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असल्याने मे महिन्यात उक्त गावांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षण अहवालातून माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दूषित पाणीपुरवठा करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच उक्त ११५ गावांना शुध्द व स्वच्छ पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे, अहमदनगर जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्यामार्फत कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा अहमदनगर व वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा अहमदनगर यांच्याकडून माहे मे, २०१७ मध्ये १४१७ पाणी नमुने तपासण्यात आले. त्यापैकी ११५ गावांतील १३१ पाणी नमुने दुषित आढळून आले. त्यांची टक्केवारी ९.२४ इतकी आहे.
(२) गटविकास अधिकारी यांनी ८७ ग्रामसेवकांना नोटीस देऊन समज देण्यात आलेली आहे. दुषित आलेले स्त्रोतांवर तात्काळ संबंधित ग्रामपंचायातीमार्फत योग्य ती उपाययोजना करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्व पाणी नमुने व टिसीएल नमुने नियमित तपासणी बाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) दुषित आलेल्या पाणी स्त्रोताचे तात्काळ टीसीएल द्वारे शुध्दीकरण करण्यात आले. स्त्रोताचा आजूबाजूचा परिसर व पाईपलाईन गळती याची स्वच्छता व दुरुस्ती करण्यात आली. तसेच सद्य:स्थितीमध्ये गावकऱ्यांना शुध्द पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(४) लागू नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील कंत्राटी प्राध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(२३) * ९६९०४ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची असंख्यपदे रिक्त असल्यामुळे कामाचा अतिरिक्त ताण कमी करण्याकरीता करण्यात येत असलेली कंत्राटी प्राध्यापकाची पदभरती लांबणीवर गेली असल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर विद्यापीठातून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे विद्यापीठांच्या प्रशासनाने ही कंत्राटी प्राध्यापकाची पदभरती सुरू केली असून ही पदभरती लांबणीवर गेल्यामुळे त्यांचा कामाचा अतिरिक्त ताण कार्यरत कर्मचाऱ्यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विद्यापीठात शिक्षक कर्मचारी प्राध्यापक-३७, सहयोगी प्राध्यापक-४६, शिक्षक समकक्ष-०९, गट-अ-३८, गट-ब-३४, तर शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग तीन-१५१, वर्ग चार-४८ पदे रिक्त असल्यामुळे त्या जागी विद्यापीठाच्या प्रशासनाने कंत्राटी प्राध्यापकाची पदभरती प्रक्रिया सुरू केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर विद्यापीठातील कंत्राटी प्राध्यापकांची पदभरती लांबणीवर जाण्याची व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठाकडून कंत्राटी शिक्षक भरतीबाबतची कार्यवाही प्रथमच केली जात असल्याने याबाबतचे नियम तयार करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरू आहे. विद्यापीठाने रिक्त शिक्षकांच्या कार्यभारानुसार अंशदानात्मक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे कार्यरत शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत नाही.

विद्यापीठात शिक्षक कर्मचारी प्राध्यापक-२७, सहयोगी प्राध्यापक-४६, शिक्षक समकक्ष-०९, गट-अ-३८, गट-ब-३४, तर शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तीन-१५१, वर्ग-चार-४८, पदे रिक्त आहेत.

(४) व (५) विद्यापीठाकडून कंत्राटी शिक्षक भरतीसाठी नियम तयार करण्याची कार्यवाही सुरू असल्याने भरती प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाही. तसेच वित्त विभागाने दि. २५.०५.२०१७ च्या शासन निर्णयानुसार जे विभाग आकृतीबंध अंतीम मंजूर करून घेणार नाहीत, तोपर्यंत त्यांना पदभरती, पदनिर्मिती तसेच पदे रूपांतरित करता येणार नाहीत असा निर्णय घेतलेला आहे. वित्त विभागाच्या दि. ११.०२.२०१६, दि. २५.०५.२०१७ चे शासन निर्णय आणि दि. २९.०६.२०१७ च्या शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे. याबाबत अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०१.०९.२०१७ रोजी बैठक आयोजित करून राज्यातील अकृषि विद्यापीठातील मंजूर पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम निश्चित केला असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील मुख्यत्वे खारपाण पट्ट्यातील गावांना पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या ८४ खेडी प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेबाबत

**(२४) * ९५९२८ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील मुख्यत्वे खारपाण पट्ट्यातील गावांना पाणी पुरवठा करण्याकरिता ८४ खेडी प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषद, अकोला यांनी हस्तांतरित करून घ्यावी अन्यथा योजना बंद करण्याचा इशारा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषद प्रशासनाला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ८४ खेडी प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्णतः निकामी झाल्याने लाभार्थी गावांना पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याबाबतच्या असंख्य तक्रारी ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजनेची पाणीपट्टी जिल्हा परिषद प्रशासनाकडून वसूल करण्यात दिरंगाई झाल्याने उक्त योजना अयशस्वी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच उक्त गावांना सुरळीत पाणी पुरवठा होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर योजनेचे हस्तांतरण न झाल्यामुळे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे योजना चालविण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे, योजनेतून पाणी पुरवठा सुरु करण्यासाठी जिल्हा परिषद देखभाल दुरुस्ती निधीमधून तूर्त रु. ५०.०० लक्ष निधी देण्याचे ठरले असून, त्यानुसार योजनेतील सर्व गावांना सुरळीत पाणी पुरवठा चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती, वाशिम व सांगली जिल्ह्यातील कलावंताना पेन्शन मिळण्याबाबत

**(२५) * ९९५१८ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील सुमारे ६५ वृध्द कलावंताना माहे ऑक्टोबर २०१६ पासून पेन्शन मिळाली नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे व वाशिम जिल्हयातील २७८ कलावंतांचे मानधन गत आठ महिने झाले तरी त्यांच्या बँक खात्यात जमा झाले नसल्याचे तसेच राष्ट्रीयकृत बँकेत खाते आणि आधार लिंक नसल्याने सांगली जिल्हयातील १७० कलाकार गत ३ वर्षाच्या कालावधीत मानधनापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्हयातील कलावंताच्या मानधनाबाबत अखिल भारतीय नाट्यपरिषद कारंजाच्या वतीने सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या संचालकांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन पाठवून उक्त बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त सर्व कलावंतांना मानधन तातडीने अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली व याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) या प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मध्यान्ह आहार योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या भोजनातून मुलांना झालेली विषबाधा

**(२६) * ९५२६४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये मध्यान्ह आहार योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या भोजनातून गत ५ वर्षात ४७० मुलांना विषबाधा झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यान्ह भोजन बनविणाऱ्या ठेकेदार व शाळांचे स्वयंपाकघर अस्वच्छ असल्याचे तसेच मध्यान्ह भोजनामध्ये वापरण्यात येणारे कच्चे धान्य (अन्नधान्य) निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदरहू योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या मध्यान्ह पोषण आहाराची गुणवत्ता तपासण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(५) तसेच सदर योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने व्हावी व विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३), (४) व (५) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागात महिला बचत गटामार्फत शाळेमध्ये अन्न शिजवून देण्यात येते. शहरी भागात जागेची कमतरता असल्याने केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे शिजवलेल्या आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे.

शालेय पोषण आहारामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या काही घटना घडलेल्या आहेत. अशा घटनांमध्ये चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, काही प्रकरणामध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ग्रामीण भागात पुरवठेदारामार्फत विद्यार्थ्यांना धान्यादी मालचा पुरवठा करताना निकृष्ठ प्रतीचा धान्यादी माल आढळल्यास तो तात्काळ बदलून देण्याची अट करारनाम्यात समाविष्ट आहे. तसेच, याबाबत पुरवठेदारास विहित दंड आकारण्यात येतो.

पुरवठेदारामार्फत पुरवठा होत असलेल्या धान्यादी मालाची तपासणी सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत वेळोवेळी करण्यात येते.

सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे अन्न मिळावे याबाबत गुणवत्ता, सुरक्षितता व स्वच्छता यासंदर्भात दक्षता घेण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टाकळी (टे) (ता.माढा, जि.सोलापूर) या गावात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मंजूर झालेल्या शौचालय निधीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२७) * ९५३२८ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी (टे) (ता.माढा, जि.सोलापूर) या गावाकरिता सन २०१५-१६ मध्ये वा त्यादरम्यान सोलापूर जिल्हा परिषदेतर्फे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत २१६ शौचालये मंजुर झाली, त्यातील ३९ शौचालये अस्तित्वात नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शौचालयासाठी मंजूर झालेल्या निधीत झालेला गैरव्यवहार निदर्शनास येऊ नये याकरिता लाभार्थ्यांना फौजदारी कारवाईच्या नोटीसा ग्रामसेवकाने दिल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहार निदर्शनास आल्याने गटविकास अधिकाऱ्यांनी ८ सदस्यांची समिती नेमली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

टाकळी (टे) (ता.माढा, जि.सोलापूर) या गावात एकूण २४ शौचालयाचे बांधकाम न करता व १६ शौचालयाचे बांधकाम अपूर्ण असताना अनुदानाचे प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

ग्रामविकास अधिकारी यांनी श्री.बापू तुकाराम महिपाल, श्री.भारत राजाराम कळसाईत, श्री.सचिन किसन जवळगे व श्री.पांडुरंग तुकाराम महिपाल यांना दिनांक ३०.०५.२०१७ रोजी फौजदारी कारवाईच्या नोटिसा दिल्या आहेत.

(३) होय.

सदर प्रकरणी सहा सदस्यांची समिती नेमली आहे.

(४) होय.

चौकशीत टाकळी (टे) (ता.माढा, जि.सोलापूर) या गावात २४ शौचालयाचे बांधकाम न करता व १६ शौचालयाचे बांधकाम अपूर्ण असताना अनुदानाचे प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने गटविकास अधिकारी यांनी ग्राम विकास अधिकारी, सरपंच, विस्तार अधिकारी (पं) व शाखा अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजाविली असून प्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीत नियमित ब्लिचिंग पावडर टाकण्यात येत नसल्याबाबत

**(२८) * ९८९०१ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील ग्रामीण भागात पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीत ब्लिचिंग पावडर नियमितपणे टाकण्यात येत नसल्यामुळे ग्रामीण भागातील ग्रामस्थांना दूषित पाणी प्यावे लागत असून त्यांना विविध आजार होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच उक्त ग्रामीण भागातील ग्रामस्थांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये रिसोड तालुक्यातील ८५ पाणी नमुने तपासले असता, फक्त एक नमुना पिण्यास अयोग्य असल्याचे आढळले. तथापि, तालुक्यात ग्रामीण भागात जलजन्य आजाराची लागण झाल्याचे आढळून आले नाही.

(३) ग्रामपंचायत स्तरावर आवश्यक त्या प्रमाणात ब्लिचींग पावडर साठा उपलब्ध ठेवण्याबाबत सर्व गट विकास अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरातील शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्थेच्या मुलींच्या वसतिगृहात झालेल्या रॅगिंगबाबत

**(२९) * ९५८३२ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्थेच्या मुलींच्या वसतिगृहातील वरच्या वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थींनींनी कनिष्ठ वर्गात शिकत असलेल्या मुलीचे अत्यंत हिन पातळीवर जावून रॅगिंग केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधित विद्यार्थीनींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील वसतिगृहातील विद्यार्थीनींनी संस्थेच्या संचालकाकडे रॅगिंग केल्याबाबत दि.२८.०८.२०१७ रोजी तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेतील रॅगिंग विरोधी समिती व ०३ वरिष्ठ महिला प्राध्यापकांच्या समितीमार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये रॅगिंग झाल्याचे निदर्शनास आल्यानुसार संबंधीत ०६ विद्यार्थीनींविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना वसतिगृहातून निष्काशित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाटण (जि.सातारा) येथील कलाकारांचे प्रलंबित असणारे मानधन मंजूर करण्याबाबत

**(३०) * ९५५१० श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण (जि.सातारा) विधानसभा मतदार संघातील तसेच जिल्हयातील इतर तालुक्याच्या ठिकाणी पारायण सोहळ्यामध्ये भजन, किर्तन व प्रवचन याद्वारे समाज प्रबोधनाचे सामाजिक व धार्मिक कार्य करणा-या कलाकारांची घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने कुटूबांचे उदरनिर्वाहाकरीता शासनाने कलाकार मानधन सुरु करावे या करिता आवश्यक त्या कागदपत्रासह जिल्हा परिषद,सातारा यांचेकडील संबंधीत विभागाकडे अर्ज दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कलाकारांनी कलाकर मानधनासाठी अर्ज करुन तसेच उक्त मानधन सुरु होण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या मुलाखती देवून ४ ते ५ वर्षांचा कालावधी होऊनही सातारा जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाकडून त्यांच्या अर्जावर कोणताही निर्णय घेतला नसल्याने अनेक कलाकार हे उक्त मानधनापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा जिल्हा परिषदेकडील सामाजिक न्याय विभागाकडील उक्त कलाकारांची यादी घेऊन पाटण मतदारसंघातील कलाकारांना तात्काळ कलाकार मानधन सुरु करणेसंदर्भात निर्णय घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री व मा.राज्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा सुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मा.सामाजिक न्याय मंत्री व मा.राज्यमंत्री यांनी या संदर्भात सातारा जिल्हा परिषदेकडून माहिती मागविली आहे काय, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कलाकारांना मानधन मिळवून देणेसंदर्भात कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक १५ जून, २०१५ रोजीचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांना दिलेले निवेदन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास प्राप्त झालेले आहे.

(४) व (५) मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांना दिलेले निवेदनासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आयुक्त समाज कल्याण, पुणे व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सातारा यांना दिनांक १६ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

-----------------

## अंमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील बंद रास्तभाव दुकाने महिला बचत गटांना देण्याबाबत

**(३१) * ९९६८३ श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील अनेक गावांतील निलंबित व तक्रारी असलेली रास्तभाव दुकाने बंद करून उक्त गावे दुसऱ्या गावातील रेशन दुकानांना जोडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील जनतेची गैरसोय दूर करण्याकरिता विविध कारणाने अकार्यान्वित असलेली रास्तभाव दुकाने त्या त्या गावातील महिला बचत गटांना द्यावीत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, अंमळनेर यांनी मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक १३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्या आदेशानुसार याबाबत उचित कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव यांना दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उपरोक्त ठिकाणी नवीन दुकानांकरिता निविदा प्रक्रिया प्रलंबित असताना संबंधित अधिकाऱ्यांनी काही दुकानदारांना रास्तभाव दुकाने देऊन गैरकारभार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली तसेच संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) होय, खरे आहे.

(४) हे खरे नाही.

रास्तभाव/शिधावाटप दुकाने व केरोसीन परवाने मंजुर करण्याबाबतच्या यापूर्वीच्या दिनांक ३ नोव्हेंबर,२००७ च्या शासन निर्णयास अनुसरुन दिनांक ३१ ऑक्टोबर २०१३ रोजी रास्तभाव दुकानांचे जाहिरनामे जळगांव जिल्हयात काढण्यात आले होते. यामध्ये अंमळनेर तालुक्याची मुलाखत प्रलंबित होती. तथापि दरम्यान अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ मधील तरतूदी विचारात घेऊन यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमित करून राज्यात नवीन रास्तभाव/शिधावाटप दुकाने व केरोसीन परवाने मंजुर करण्याबाबत दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी शासन

निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामुळे तसेच दिनांक १ ऑगस्ट, २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार अंमळनेर तालुक्यातील एकूण २० गावामध्ये दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी नव्याने जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुर्झे (ता.तलासरी, जि.पालघर) या आदिवासी भागात रास्तभाव दुकानातून लाभार्थ्यांना रासायनिक खत मिश्रित तांदूळाचे करण्यात आलेले वाटप

**(३२) * ९५१२२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्झे (ता.तलासरी, जि.पालघर) या आदिवासी भागातील वनिता महिला बचतगट रास्तभाव दुकान गट क्र.१ मधून रासायनिक खत मिश्रित तांदूळ लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान वितरित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वितरित करण्यात आलेला तांदूळ लाभार्थ्यांनी खाल्ल्याने त्यांना उलटी, पोटदुखणे, मळमळ होणे, चक्कर येणे, आदि त्रास झाल्याचे या प्रकरणी केलेल्या पाहणीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भागातील लाभार्थ्यांना गोदामामध्ये खाली पडलेला तांदूळ, गहू पोत्यात भरुन दुकानदारांना दिला जातो, ही बाब पुरवठा निरीक्षकांनी मान्य केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय गोदामात येणारा तांदूळ किंवा गहू इ.धान्याचा दर्जा तपासणीकडे तहसिलदार व पुरवठा अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून पुरवठा अधिकारी तपासणीच्या नावाने रास्तभाव दुकानदारांची आर्थिक फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच लाभार्थ्यांना उत्तम प्रतीचे धान्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली   वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(५) प्रस्तुत प्रकरणी लाभार्थ्यांना वाटप केलेले धान्य परत घेण्यात आले असून, त्याबदल्यात त्यांना धान्य बदलून देण्यात आले आहे. परत घेतलेले धान्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आले असता, त्यांच्या अहवालात सदर धान्य मानवास खाण्यास अखाद्य असल्याबाबत स्पष्ट उल्लेख नसून, सदर धान्य ९० टक्के चांगले असल्याबाबत प्रयोगशाळेने प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर धान्य तपासणीअंती मानवास खाण्यास अयोग्य असल्याचे नमूद नसल्याने, संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# अचलपूर व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील सापन प्रकल्पावरील ८३ गावांमधील पाणी टंचाईबाबत

**(३३) * १००४९१ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील सापन प्रकल्पावरील टंचाईग्रस्त ८३ गावांचा समावेश मुख्यमंत्री पाणीपुरवठा योजना टप्पा क्र.२ मध्ये करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांना टँकरने पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याने व पाणी पातळी खोल गेल्यामुळे भूनलिकांमधून पाणी मिळत नसल्याने या गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण होत असून तातडीने या संदर्भात कार्यवाही करावी अशीही मागणी उक्त निवेदनात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त गावांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्याकरिता व मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत अचलपूर व चांदुरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील ८३ गावांकरिता प्रादेशिक पाणीपुरवठा योजना राबविण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता रु.१४२.७७ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल दि.२१.११.२०१७ रोजी प्रशासकीय मंजूरीसाठी शासनास प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीबाबत

**(३४) * १००९९१ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यात एकूण २७४ प्राथमिक शाळा असून पैकी ५१ शाळांना विद्युतीकरणाची सोय नसल्याने शाळा अंधारात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शाळांमध्ये मुलभूत सुविधा, मैदाने व इमारती नाहीत, काही शाळांना समाज मंदिराचा आधार घ्यावा लागत आहे, अनेक शाळा मोडकळीस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांचा पट घटत चालला असून पालकांचा कल खाजगी शाळांकडे वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या इमारती दुरुस्त करणेबाबत किंवा नवीन बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषदेच्या ४८ शाळांमध्ये वीजेचे पोल नसल्याने विद्युत सुविधा उपलब्ध नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) जिल्हा परिषदेच्या ८३ शाळांची दुरूस्ती व ४२ वर्गखोल्यांचे बांधकाम यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे व पंतप्रधान खनिज क्षेत्र कल्याण योजनांतर्गत मागणी करण्यात आली आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये सर्व शिक्षा अभियानातून ३ वर्गखोल्यांचे बांधकाम व १ शाळेच्या दुरूस्तीसाठी मंजूरी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेकडून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे नरिमन पॉईंटसह गिरगाव व जुहू चौपाटी येथे होत असलेले जल प्रदूषण

**(३५) * ९६४४४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका प्रक्रिया न करताच घाण सांडपाणी समुद्रात सोडत असल्याने नरिमन पॉईंट, गिरगाव चौपाटी व जुहू चौपाटी या ठिकाणी मोठया प्रमाणावर जल प्रदूषण होऊन तेथील जीवसृष्टी नष्ट होत असल्याबाबत सिटीजन सर्कल फॉर सोशल वेल्फेअर ॲन्ड एज्युकेशन (मुंबई) या सामाजिक संस्थेने मा.पर्यावरण मंत्री, सचिव, पर्यावरण विभाग तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्‌वारे चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार जलप्रदूषण कमी करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) सिटीजन सर्कल फॉर सोशल वेल्फेअर ॲन्ड एज्युकेशन (मुंबई) या सामाजिक संस्थेचे निवेदन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेले नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अरबी समुद्राच्या पाण्याचे नमुने वेळोवेळी संकलित करुन गुणवत्ता तपासली जाते.

(२) समुद्राच्या पाण्याच्या गुणवत्ता अहवालावरुन समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता खालावलेली दिसून येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी महानगरपालिकेस योग्य ती दक्षता घेण्यासंबंधी कळविण्यात येत आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महानगरपालिकेस भागभांडवलात २५ टक्के रक्कम सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी राखीव ठेवल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहुलगांव, चेंबूर (मुंबई) येथील गडकरी खाण परिसरात प्रकाशनगर भागात सिमेंट निर्मिती प्रकल्पामुळे होत असलेले प्रदूषण

**(३६) * ९६७८७ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहुलगांव, चेंबूर (मुंबई) येथील गडकरी खाण परिसरातील प्रकाशनगर भागात रहिवाशी वस्तीमध्ये एक सिमेंट निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात आला असून या प्रकल्पामुळे या परिसरातील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने शेकडो रहिवाशांनी तसेच नगरसेविका श्रीमती निधी शिंदे यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका इत्यादीकडे या प्रकल्पा विरोधात अनेक तक्रारी करुनही उक्त बेकायदा प्रकल्प अद्यापही सुरु असल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदुषण नियंत्रण मंडळाने उक्त प्रकल्प बंद करण्याचे आदेश दोन महिन्यांपूर्वी देऊनही सदर प्रकल्प अद्यापी बंद करण्यात आलेला नाही तसेच या प्रकल्पाचा विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा बंद केल्यानंतर प्रकल्पाच्या मालकाने टँकरद्वारे पाणी आणून व जनरेटरद्वारे वीज घेऊन काम सुरु ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्प बंद करण्याकरीता प्रदुषण नियंत्रण मंडळाने किती वेळा नोटीस पाठविली आहे, प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या या नोटीसकडे प्रकल्प मालकाने दुर्लक्ष करून सदर प्रकल्प सुरु ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रकल्पाच्या मालका विरोधात प्रदुषण नियंत्रणासंदर्भातील कोणकोणत्या कायद्यानुसार कारवाई करण्यात आली वा येत आहे, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर प्रकल्पास जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९७४ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९८१ मधील तरतूदीनुसार दिनांक १०.०७.२०१७ रोजी उत्पादन बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिले आहेत. सदर आदेशानुसार प्रश्नाधीन प्रकल्पाचे उत्पादन बंद असल्याचे याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १६.११.२०१७ रोजी केलेल्या पाहणी दरम्यान निदर्शनास आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील परीक्षा विभागाच्या गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान

**(३७) * ९८९३८ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठातील व्यवस्थापन शाखेच्या (MBA) प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा ऑनलाईन निकाल माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये जाहीर होऊनही विद्यार्थ्यांना गुण पत्रिका मिळाल्या नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी शैक्षणिक कर्ज घेऊन एम. बी. ए चे शिक्षण घेत असून त्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या गुण पत्रिका दरवर्षी बँकेकडे जमा न केल्यास पुढील शैक्षणिक कर्ज रद्द होत असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालय प्रशासनाकडून परीक्षा विभागाकडे गुणपत्रिका मिळणेबाबत सातत्याने विचारणा केली जात असता परीक्षा विभागाकडून त्यांना बेजबाबदारपणे उत्तरे दिली जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठातील परीक्षा विभागाकडून गुण पत्रिका मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) एम.बी.ए. परीक्षेचा निकाल नोव्हेंबर, २०१६ मध्ये जाहीर झालेला नसून परीक्षा दि.२९ नोव्हेंबर, २०१६ रोजी आयोजित झालेली होती. निकाल फेब्रुवारी, २०१७ मध्ये जाहीर झालेला आहे व गुणपत्रिका ऑगस्ट, २०१७ मध्ये वितरित झाल्या आहेत.

(२) नाही.

(३) नाही.

(४) गुणपत्रिका वितरित करण्यात आलेल्या असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील वावी सह ११ गावातील पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीबाबत

**(३८) * ९६५५२ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील वावी सह ११ गावातील पाणी पुरवठा योजना नादुरुस्त असून मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत असल्याने योजनेत समाविष्ट गावांमधील ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पाणी पुरवठा योजना सुरळीतपणे चालू होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त पाणी पुरवठा योजना सुरळीतपणे सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) सिन्नर तालुक्यातील वावी सह ११ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पूर्ण करण्यात आली. सदर योजना दि.१.५.२०१४ रोजी समाविष्ट गावांच्या संयुक्त पाणी पुरवठा समितीस हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदर याजनेची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती संबंधित संयुक्त पाणी पुरवठा समितीमार्फत करण्यात येते. परंतु सदर योजनेचा पाणी पुरवठा १) कॅनॉल इनटेक ते साठवण तलावा दरम्यान असलेली पाईपलाईन गळती २) जलशुध्दीकरण केंद्राची काही उपांगे नादुरूस्त असल्यामुळे ३) योजनेच्या संयुक्त पाणी पुरवठा समिती पुर्नगठणा विषयी वाद असल्यामुळे विस्कळीत झाल्याचे निदर्शनास आले.

सद्यस्थितीत, कॅनॉल इनटेक ते साठवण तलाव दरम्यान असलेल्या पाईपलाईनची गळती काढण्यात आली आहे. जलशुध्दीकरण केंद्राच्या उपांगाच्या दुरूस्ती विषयी संयुक्त पाणी पुरवठा समितीस कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच नवीन संयुक्त पाणी पुरवठा समिती पुर्नगठण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत योजनेतील गावांना पाणी पुरवठा सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापिठाच्या ऑनलाईन असेसमेंटमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान

**(३९) * ९५५१७ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन**

**पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापिठाच्या ऑनलाईन असेसमेंटच्या गोंधळात गहाळ झालेल्या सुमारे दीड हजार उत्तरपत्रिका शोधण्यात अपयश आल्याने विद्यार्थ्यांना सरासरी गुण देण्याचा निर्णय विदयापिठाच्या परिक्षा मंडळाने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विदयापीठाचे गत शैक्षणिक वर्षातील निकाल तिसरी डेड लाईन संपल्यानंतर सुमारे ४ महिन्यांच्या विलंबाने लागणे, ४७७ परीक्षांचे निकाल जाहीर केले असले तरीही सुमारे ११ हजार विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित असणे तसेच सुमारे ५० हजार विद्यार्थी पुनर्मूल्यांकन निकालाच्या प्रतिक्षेत असणे

यामुळे पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश, विदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विदयार्थ्यांचे प्रवेश, इतर अभ्यासक्रमांचे प्रवेश इत्यादी प्रवेशांवर त्याचा परिणाम झाला असून अनेक परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) विद्यापीठाच्या निकाल गोंधळासंदर्भात राज्याच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाने चौकशी करुन मा. राज्यपालांना तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाला माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान एक अहवाल सादर केला असून सदरहू अहवालात उत्तर पत्रिका तपासणीत कोणकोणत्या अडचणी आल्याचे नमुद केले आहे, तसेच उक्त निकाल गोंधळामुळे आयडॉलची प्रवेश प्रक्रियेस विलंब होऊन विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याने विद्यापीठाला आर्थिक तोटा सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त विदयापीठाच्या ऑनलाईन असेसमेंटच्या कंत्राटात कोटयावधीचा गैरव्यवहार झाल्याचा संशय माजी कुलगुरु श्री. भालचंद्र मुणगेकर यांनी मुंबई येथे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केला असून उक्त गैरव्यवहाराची न्यायालयीन चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई विद्यापीठात हिवाळी सत्राच्या परीक्षा सुरू झाल्या असल्या तरीही विद्यार्थ्यांना उन्हाळी सत्राच्या परीक्षांचे निकाल मिळाले नसल्याने, जाहीर झालेल्या निकालात परिक्षा दिलेल्या विद्यार्थांना गैरहजर दाखविण्यात आले असल्याने व कांहीना लवकरच निकाल जाहीर होणार असल्याचा संदेश येत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अहवालात खालील अडचणी निदर्शनास आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(अ) उत्तर पुस्तिकांच्या भाग-१ व भाग-२ चे काम वेगवेगळ्या कंपन्यांनी केल्यामुळे बारकोड न जुळणे.

(ब) नवीन मुल्यांकन पध्दती विषयी संबंधितांना ज्ञान नसणे.

(क) कंपनीस उत्तर पुस्तिकेबरोबर पुरवणी जोडली जाते ही संकल्पना माहिती नसणे.

(ड) कंपनी आणि विद्यापीठातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे परिक्षा मूल्याकंनाच्या कामावर गुणवत्तापूर्ण नियंत्रण नसणे.

(इ) विद्यापीठातील अधिकारी व कंपनीमध्ये समन्वयाचा अभाव.

तसेच आयडॉल प्रथम वर्षाचे प्रवेश हे १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांमधून करण्यात येत असल्याने आयडॉल प्रवेश प्रक्रीयेशी त्याचा संबंध लावता येणार नाही.

(४) होय.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई (जि.बीड) तालुक्यामध्ये भारत निर्माण व राष्ट्रीय पाणीपुरवठा योजनेंतर्गत मंजूर झालेल्या पाणी पुरवठा योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४०) * ९८१२५ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यामधील १५९ गावांना भारत निर्माण व राष्ट्रीय पाणीपुरवठा योजनेंतर्गत सन २००५-०६ ते २०१३-१४ या कालावधीत पाणीपुरवठा योजना मंजूर झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना अद्यापही पूर्ण झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनांना मंजूरी मिळालेल्या गावांच्या स्थानिक समित्यांनी उक्त योजनेतील कामे पूर्ण न करता बनावट देयके सादर करून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली व सदर योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.

गेवराई तालुक्यातील १५९ योजनेपैकी ८४ योजना पुर्ण झाल्या असून सदर गावांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(३) अंशत: खरे आहे.

एकुण २५ गावातील समित्यांनी निधीचा गैरवापर केला असल्याचे चौकशी दरम्यान आढळून आले आहे.
(४) सदरहू प्रकरणी जिल्हा परिषद स्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व पंचायत समिती स्तरावर चौकशी करण्यात आली आहे.

चौकशी दरम्यान दोषी असलेल्या एकुण १० ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या पदाधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे व १५ समितीच्या पदधिकाऱ्याच्या स्थावर मालमत्तेवर आर्थिक बोजा टाकण्याची शिफारस जिल्हाधिकारी यांचेकडे केलेली आहे.

उर्वरीत ५० योजनांपैकी मार्च २०१८ अखेर २० व मार्च-२०१९ पर्यंत उर्वरीत ३० योजनांची कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यासह अनेक गावांमध्ये होत असलेला दूषित पाणीपुरवठा

**(४१) * ९६९८५ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यामधील ३४ गावांसह जिल्हयातील अनेक गावात ब्लिचिंग पावडर नसल्यामुळे अनेक ठिकाणी पाण्याचे शुद्धीकरण होत नसल्याचे दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेनगाव तालुक्यासह जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी केरकचरा व घाणपाणी साचून राहील्यामुळे व वेळेवर धूर फवारणी होत नसल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने तसेच दूषित पाण्यामुळे विविध आजार वाढल्याने लहान बालकांसह रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार जिल्हयामध्ये पाणी शुध्दीकरणाकरिता कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

हिंगोली जिल्हयांतर्गत माहे जुलै २०१७ वा त्या दरम्यान प्राप्त अहवालानुसार सेनगाव तालुक्यातील १६ व जिल्हयातील एकूण ३८ गावांमध्ये ब्लिचिंग पावडर उपलब्ध नव्हते.

तसेच जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा हिंगोली यांच्या अहवालानुसार सेनगाव तालुक्यातील ३३ गावांसह जिल्हयातील एकूण ७११ गावातील तपासलेल्या ६५६ पाणी नमुन्यांपैकी १४१ गावांमध्ये १८१ पाणी नमुने दुषित आढळून आले आहेत.
(२) हे खरे नाही.

सेनगाव तालुक्यातील सेनगाव व गुगुळ पिंपरी या गावांसह जिल्हयातील पांगराशिंदे, पार्डी बागल, कुरुदा, डोंगरकडासह कळमनुरी व हिंगोली शहर या ७ ठिकाणी धूर फवारणी वेळेवर करण्यात आली.

जिल्हयातील १९ गावांसह हिंगोली व कळमनुरी शहर इत्यादी ठिकाणी किटकनाशक फवारणी करण्यात आली. जिल्हयातील एकूण ७११ गावांमध्ये दैनंदिन किटकशास्त्रीय सर्वेक्षणात डास अळी आढळलेल्या भांड्यांमध्ये (रांजण,हौद,टाकी इत्यादी ठिकाणी) ॲबटचे द्रावण प्रमाणात टाकण्यात आले.

त्यामुळे डासांची उत्पत्ती कमी झाली. दरम्यानच्या काळात दूषित पाण्यामुळे व डासांच्या प्रादुर्भावामुळे आढळून आलेल्या रूग्णांवर वेळीच उपचार करण्यात आले असून त्यामुळे कोणत्याही आजाराची साथ पसरली नाही.

(३) वरील प्रमाणे ब्लिचिंग पावडर नसलेल्या ३८ गावात ISI मार्क ३३% क्लोरिन असलेल्या टि.सी.एल. पावडरचा तीन महिने पुरेल एवढा साठा प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ठेवण्यात आलेला आहे. दूषित पाणी नमुने आढळून आलेल्या एकूण १४१ गावच्या ग्रामपंचायतीना सूचना देण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी वेळीच कळविण्यात आले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना सर्वेक्षण करून उपाययोजना करण्याबाबत मासिक बैठकीत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घराडी (ता.मंडणगड जि.रत्नागिरी) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४२) * १००४६० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घराडी (ता.मंडणगड जि.रत्नागिरी) येथील सुमारे ४० लाख रुपये किंमतीच्या राष्ट्रीय पेयजल योजनेमध्ये गैरव्यवहार झाला असून येथील ग्रामस्थांना प्यायचे पाणी मिळत नसल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना सन २०११ मध्ये मंजूर झाली असून सदर योजनेच्या कामाचा कालावधी पूर्ण होऊनही ठेकेदाराने अद्याप कामे अपूर्ण ठेवली आहेत तसेच निकृष्ट दर्जाचे काम करून अनियमितता व गैरव्यवहार केल्याने ग्रामस्थांनी मंडगणड पंचायत समितीसमोर दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेसाठी ग्रामपंचायत एका कुटुंबाकडून १४४० रुपये इतकी पाणीपट्टी वसूल करते मात्र वर्षाला ४० दिवसच या योजनेतून पाणी दिले जात असून ग्रामस्थांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली व उक्त गावाला सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. सदरची योजना सन २०११ मध्ये मंजूर असून सन २०१३ मध्ये अंतिम करुन ग्रामपंचायतीकडे हस्तांरीत करण्यात आलेली आहे. सन २०१३ पासून आतापर्यंत सदर गावात पाणी टंचाई भासलेली नाही. परंतू सद्यस्थितीमध्ये वितरण वाहिनी नादुरुस्त असल्याने पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. सबब ग्रामस्थांनी दि. १ नोव्हेंबर, २०१७ रोजी उपोषणाची नोटीस दिली होती. परंतू सदर उपोषण मागे घेण्यात आले.
(३) व (४) सदरबाबत संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंडणगड यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. अंतिम अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठासह राज्यातील अनेक महाविद्यालयात अनधिकृत अभ्यासक्रम सुरु असल्याबाबत

**(४३) * ९५८४१ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठासह राज्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) ठरवून दिलेल्या पदविका अभ्यासक्रमां व्यतिरिक्त अन्य अनधिकृत अभ्यासक्रम सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाबाबत युजीसीच्या नियमावलीनुसार अधिसूचनेत नमूद करण्यात आलेले अभ्यासक्रम राबविणे बंधनकारक असतानाही मुंबई विद्यापीठातील २२ महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तरचे चार पार्ट टाईम अभ्यासक्रम अनधिकृतपणे सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पदव्यांचे अभ्यासक्रम चालविण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता घेतलेली नसून या अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच महाविद्यालयांमध्ये समाविष्ट करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांवर नियंत्रण ठेवण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) ते (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांकडून सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रीत पाण्यामुळे होत असलेले नदीचे प्रदुषण**

**(४४) * ९५६२२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यामार्फत प्रक्रिया न करता रसायन मिश्रीत दुषित पाणी नदीपात्रात सोडल्यामुळे मानवी

व प्राण्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून घोट नदीतील हजारो मासे मृत्युमुखी पडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासे मरण पावल्याची महिन्याभरातील ही दुसरी घटना असून उक्त औद्योगिक वसाहतीमधील नद्यांमध्ये स्थानिक मच्छिमार मच्छी विक्रीचा पारंपारीक व्यवसाय करीत असून मासे मृत्युमुखी पडल्यामुळे मच्छिमारांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रदूषणाबाबत नवी मुंबई येथील पशुसंरक्षण सेल ने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे तसेच वारंवार तक्रार करून सुद्धा दोषी कंपन्यांविरूध्द कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नद्यांमध्ये रासायनिक मिश्रीत पाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर तसेच संबधितांवर कोणती कारवाई केली व उक्त नद्या प्रदूषणमुक्त करून प्रदूषण रोखण्याकरिता व मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून केलेल्या पाहणीमध्ये तळोजा येथील औद्योगिक वसाहतीमधील कंपन्याकडून सांडपाणी प्रक्रिया न करता घोट नदी मध्ये पाणी सोडल्यामुळे येथे मासे मृत्यु झाल्याची घटना घडल्याचे आढळून आले. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चार मत्स्यप्रक्रिया करणाऱ्या उद्योगाना जल (प्र व प्रनि) कायदा, १९७४ च्या कलम, ३३ अ अन्वये उत्पादन बंद करण्याचे आदेश बजावले होते. माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये घोट नदीमध्ये मासे मृत झाल्याची तक्रार प्राप्त झाल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीमध्ये चार मत्स्य उद्योगानी सांडपाणी प्रक्रिया न करता घोट नदीमध्ये पाणी सोडल्याचे प्रथम दर्शनी आढळून आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल (प्र व प्रनि) कायदा, १९७४ च्या कलम, ३३ अ अन्वये आदेश दिले आहेत. उपरोक्त

दोन्ही घटनेमध्ये योग्य खबरदारी न घेतल्यामुळे कार्यकारी अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अलिबाग याना जल (प्र व प्रनि) कायदा, १९७४ च्या कलम, ३३ अ अन्वये प्रस्तावित आदेश बजावण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या भोजन भत्त्यांमध्ये वाढ करणेबाबत

**(४५) * ९६५६४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी शासनाने १९६६ पासून शासकीय विद्यानिकेतन या नावाने निवासी शाळा सुरु करुन गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची मोफत निवास व भोजनाची व्यवस्था केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भोजन भत्त्यांमध्ये सन २००५ पासून म्हणजे गत १२ वर्षापासून वाढ केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) भोजन भत्त्यामध्ये वाढ करण्याची बाब तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयात रेशन धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(४६) * ९५९४० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील बुलढाणा, खामगाव, चिखली, लोणार, मेहकर इत्यादी सह अन्य तालुक्यात माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत रेशन धान्याचा काळ्या बाजारातील मोठा साठा जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात स्वस्त धान्य संदर्भात जप्त करण्यात आलेल्या दस्तऐवजांमध्ये मोठया प्रमाणात बनावट पावत्या आढळून आल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त ठिकाणच्या रेशन धान्यांच्या काळयाबाजारात धान्य पुरवठा करणाऱ्या कंत्राटधारकासोबतच पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचा सहभाग आहे व याबाबत शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उक्त जिल्हयातील स्वस्त धान्य दुकानांची तपासणी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अशंत: खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) प्रस्तुत प्रकरणी ३२ स्वस्त धान्य दुकानांच्या तपासणीअंती आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने १३ दुकाने निलंबित,०२ दुकाने रद्द, ०४ दुकानांची अनामत रक्कम शासन जमा करण्यात आली आहे व उर्वरीत सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे व पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच खामगाव येथील शासकीय धान्य गोदामाच्या गोदाम व्यवस्थापकास निलंबित करण्यात आलेले आहे.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे बनावट गुटखा निर्मितीच्या कारखान्यावर घातलेला छापा

**(४७) * ९५२३६ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कालुस्ते खुर्द, जांभुळकोंडा (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे सुरू असलेल्या बनावट गुटखा निर्मिती करणाऱ्या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने व दिनांक ११ व १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी छापा घालून सुमारे १७ लाख रुपयांचा माल जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणामध्ये अटक केलेली मोसीन मोहमद हनीफ मेमन व श्रीमती हसीना कुपे यांच्याविरुध्द गुटखा उत्पादन, विक्री, साठा केल्याबाबत कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उपरोक्त संशयितांवर जुजबी कारवाई करण्यात येऊन सदयस्थितीत पुढील तपासात शिथिलता आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी श्री.मोहसिन मोहम्मद हनीफ मेमन व इतर दोन यांचे विरुध्द गुटखा उत्पादन, विक्री, साठा केल्याप्रकरणी कारवाई केली असून श्रीमती हसीना कुपे, या सदर जागेच्या मालक असल्याने त्याचे प्रकरणी स्थानिक पोलिसांकडून चौकशी करण्याबाबत प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) बनावट गुटखा निर्मित करणाऱ्या ३ व्यक्तींवर दिनांक १४.१०.२०१७ रोजी एफआरआय क्रमांक ०२४३/२०१७ नोंदविण्यात आला आहे. तसेच जागा मालकाबाबत कारवाई करण्याबाबत स्थानिक पोलिस प्रशासनास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गळनिंब (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील पाणी योजना सुरु करण्याबाबत

**(४८) * ९७४५५ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गळनिंब (ता.नेवासा, जि.अहमदनगर) पाणी योजनेची वीज देयके अदा करण्याची कार्यवाही होत नसल्याने उक्त योजनेवर अवलंबून असणाऱ्या १९ गावांच्या महिलांना पाण्याकरिता भटकंती करावी लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील समाविष्ट ग्रामपंचायतींकडून १०० टक्के पाणीपट्टी वसूल होत नसल्यामुळे नियमित वीज देयके, पाणी देयके व योजना चालविण्याचा देखभाल दुरुस्तीचा खर्च भागविणे शक्य होत नसल्याने उक्त योजना सुरळीत चालू ठेवण्यास अडचणी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त योजना सुरुळीत सुरू ठेवण्याकरिता व योजनेच्या वीज देयकाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

सदर योजना ठेकेदारामार्फत गट विकास अधिकारी यांचे स्तरावरुन चालविण्यात येत आहे. थकीत विद्युत देयकामुळे माहे जुलै, २०१७ पासून योजनेमधून पाणी पुरवठा बंद आहे. सदर योजना सुरळीत चालू ठेवण्याकरिता गट विकास अधिकारी पातळीवरुन योजनेमधील समाविष्ट ग्रामपंचायतीचे सदस्य, ग्रामसेवक, पंचायत समिती सदस्य यांची बैठक दि.२१.१२.२०१६ रोजी घेण्यात आली. थकीत पाणीपट्टी, थकीत वीज देयक भरणे तसेच योजना हस्तांतरीत करणे करीता संयुक्त पाणी पुरवठा समिती गठीत करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. सद्यस्थितीत सदर योजनेमधील २५०० मी. लांबीची डी.आय. प्रकारची उर्ध्ववाहिनी गंजली असल्याने त्याऐवजी एचडीपीई प्रकारची पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा सन २०१७-१८ च्या टंचाई आराखडयात समावेश करण्यात आलेला आहे.

माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर सदर योजनेची विद्युत थकबाकी रु.८२.०० लक्ष इतकी असून सन २०१७-१८ ची पाणीपट्टी ची थकबाकीसह एकूण मागणी रु.३८.१० लक्ष इतकी असून माहे ऑक्टोबर २०१७ अखेर पाणीपट्टी वसूली निरंक आहे. थकीत विद्युत देयक भरणेकरीता ग्रामपंचायतींकडून पाणीपट्टी वसूलीद्वारे निधी जमा करणे करीता गट विकास अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायतीना नोटिसीद्वारे सूचना देण्यात आल्या असून योजना सुरु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यासह राज्यातील जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये तांदूळ, धान्य पुरवठा करणेबाबत व संगणक परिचालकांचे थकीत वेतन देणेबाबत

**(४९) * ९५७५४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष**

**टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यासह राज्यातील जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शासनाने तांदुळ पुरवठादाराची नेमणूक न केल्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारापासून वंचित रहावे लागत असल्याचे तसेच राज्यातील काही शाळांमध्ये केवळ तीन-चार दिवस पुरेल इतकेच पोषण आहाराचे धान्य शिल्लक असल्याचे अनुक्रमे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता तांदुळ आणि धान्य पुरवण्यासाठी नेमलेल्या ठेकेदारांची मुद्त संपल्यामुळे तांदुळ व धान्याची टंचाई भासत असल्याने पुरवठा दाराची नेमणूक होईपर्यंत धान्य खरेदी करण्याची जबाबदारी वरीष्ठ अधिकाऱ्यांनी व्यवस्थापन समिती अथवा आहार शिजविणाऱ्या यंत्रणेवर सोपविली असल्याचे व मुख्याध्यापकांनी आपल्या स्वखर्चानी तांदुळाची खरेदी खुल्या बाजारातून करावी असे आदेश शासनाने सर्व शाळांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शालेय पोषण आहार योजनेतील संगणक परिचालकांचे ६ महिन्यांचे वेतन थकल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर शाळांना तांदूळ व धान्य पुरवठा करण्यासाठी पुरवठादाराची नेमणूक करण्याकरीता व संगणक परिचालकांचे थकीत वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धान्यादी मालाची खरेदी करण्यासाठी संबंधित शाळेच्या अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांवर जबाबदारी देण्यात आली असून तांदळाचा पुरवठा पुरवठेदारामार्फत करण्यात येत आहे.

(३) डाटा एंन्ट्री ऑपरेटर्सचे माहे एप्रिल ते सप्टेंबर २०१७ पर्यंतचे मानधन तालुकास्तरावर वितरीत करण्यात आले आहे.
(४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळांना तांदूळ व इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठेदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. डाटा एंन्ट्री ऑपरेटर्सचे थकीत वेतन तालुकास्तरावरुन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखान्यातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडल्यामुळे झालेले प्रदुषण

**(५०) * ९७६३९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखान्यांतील प्रदूषित सांडपाणी दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास नदीच्या पात्रात सोडल्याने नदीतील पाणी दूषित झाल्याचे, त्यामुळे मासे मृत्यूमुखी पडल्याचे व स्थानिक नागरिकांना आरोग्याच्या विविध समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाड एमआयडीसी येथील प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी श्री.प्रमोद माने यांनी मृत्युमुखी पडलेले मासे शासनाच्या चिपळूण येथील प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रासायनिक कारखान्यातून होत असलेल्या वायू व जल प्रदूषणाच्या घटना वारंवार घडत असूनही सदर कारखान्यांवर कारवाई करण्यास दिरंगाई केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित कंपन्या व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच येथील परिसर कायमस्वरूपी प्रदूषण मुक्त होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे. परंतू सदरील घटना ही टेमघर नाल्यामध्ये घडलेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) दिनांक ०६/०९/२०१७ रोजी केलेल्या पाहणीनुसार एकूण ०४ कारखान्यावर उत्पादन बंद करण्याची कारवाई करण्यात आली होती. तथापि, तद्नंतर त्यापैकी ०३ कारखान्यांनी सुधारणा केल्यानंतर त्यांना पुन्हा उत्पादन सूरू करण्याची परवानगी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील जिल्हा परिषदेअंतर्गत पाणी पुरवठयाच्या ५७ योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५१) * ९८९०४ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील जिल्हा परिषदेअंतर्गत पाणी पुरवठयाच्या ५७ योजनांमध्ये दोन कोटी १६ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याबाबतचा अहवाल मा.पाणी पुरवठा मंत्री यांना सादर करण्यात येऊनही या प्रकरणातील दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळून आलेल्या संबंधितावर कोणती कारवाई केली तसेच दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.
अमरावती विभागातील जिल्हा परिषदेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी ५७ योजनांबाबत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

१. गैरव्यवहार झालेल्या योजना- ५७

२. गुन्हा दाखल केलेली प्रकरणे- २१

३. न्यायप्रविष्ठ प्रकरणे- ३

४. वसूली करण्यात आलेली प्रकरणे- १२

५. वसूलीची कार्यवाही सुरु असलेली- १२.

६. समितीकडून कामे पूर्ण करण्यात आलेली प्रकरणे- ९

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या विद्यापीठांच्या विभाजनाबाबत

**(५२) * ९५१५६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांमध्ये संलग्नित असलेल्या महाविद्यालयांची संख्या ५०० पेक्षा अधिक आहे त्यांचे विभाजन करुन नवीन विद्यापीठे स्थापन करावी किंवा विद्यापीठांचे विभाजन करावे किंवा पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेण्यासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापन करावे व पदव्युत्तर आणि संशोधनाचे कार्य विद्यापीठाकडे ठेवावे याबाबत शासनास सल्ला देण्यासाठी राज्यातील अकृषी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण विहीत करण्यासाठी डॉ. योगानंद काळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाने समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.योगानंद काळे समितीने गत वर्षात याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालातील एकूण शिफारशीं पैकी किती शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत,

(४) तसेच राज्यातील विद्यापीठांचे विभाजन करुन जिल्हानिहाय उपकेंद्रे निर्माण करण्यात यावीत या शिफारशीसह अन्य शिफारशी स्वीकारण्यात याव्यात किंवा नाही व त्याबाबतची व्यवहार्यता तपासून अंतिम निर्णय घेण्याच्या शासनाच्या विचाराधीन असलेल्या बाबी प्रकरणी शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) डॉ. योगानंद काळे यांचे अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या शिफारशी स्विकाराव्यात किंवा कसे याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षणभिंतीच्या बांधकामाबाबत

**(५३) * ९९१८७ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठात झालेल्या सुरक्षारक्षकाच्या खुनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या सुरक्षाव्यवस्थासाठी बाहेरील बाजूस १० फुट उंचीची संरक्षण भितींची आवश्यकता असताना विद्यापीठ परिसरातील विविध भागात व पुतळ्यांच्या सुरक्षा भिंतीसाठी २० कोटी रुपये खर्च केल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच सुरक्षाभिंतीसाठी अनुक्रमे २०१३ साली ५७ लाख २२ हजार, २०१५ साली ६० लाख ३७ हजार, तर २०१६ साली २ कोटी ५२ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच कामासाठी तीन निविदा काढण्याचे कारण काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बाहेरील बाजूस उभारावयाच्या संरक्षण भितींबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) विद्यापीठाच्या चोहोबाजूंनी सुरक्षा भिंत आहे. ज्या ठिकाणी सुरक्षा भिंत वारंवार तोडण्यात येते त्या ठिकाणी सिमेंट कॉक्रीटमध्ये भिंत बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील बारागाव पिंप्री व ६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(५४) * ९६५५३ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील बारागाव पिंप्री व ६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना अपूर्ण असल्याने उक्त योजनेत समाविष्ट असलेल्या गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पाणी पुरवठा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजना पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) योजनेची कामे अपूर्ण आहे हे खरे आहे . मात्र समाविष्ट गावांना माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला नाही.
(२) हे खरे आहे.
(३) योजनेची बहुतांश ८० % कामे पूर्ण झाली आहेत. ऑक्टो, २०१७ मध्ये रु.२३.३६ लक्ष इतका निधी प्राप्त झाला, सदर उपलब्ध झालेल्या निधीतून ठेकेदाराकडून पाणी पुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक कामे करून घेण्यात येत आहेत व योजनेची कामे पूर्ण करण्याकरीता कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठी भाषा धोरण ठरविणेसाठी होत असलेल्या विलंबाबाबत

**(५५) * ९७०४३ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतातील अनेक राज्यात त्यांच्या राज्याची राजभाषा उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत सक्तीची करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रात अजूनही असे धोरण आले नसल्यामुळे मराठी भाषा सक्तीची करता येत नाही, असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील मराठी भाषा सल्लागार समितीने मराठी भाषा धोरणाचा मसुदा तयार करून दिनांक ३० जून, २०१७ रोजी सादर केला असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषा धोरण ठरविणे बाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) भाषा धोरणाचा मसुदा शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संग्रामपूर व जळगांव-जामोद (जि.बुलढाणा) तालुक्यातील विविध कामाकरिता वरिष्ठ भू-वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण यंत्रणा यांनी ई निविदा प्रक्रियेत केलेल्या गैरप्रकाराबाबत

**(५६) * ९९०४६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संग्रामपूर व जळगांव-जामोद (जि.बुलढाणा) तालुक्यातील विविध कामाकरिता वरिष्ठ भू-वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण यंत्रणा, बुलढाणा यांनी सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात काढलेल्या ई निवेदा प्रक्रियेत मर्जीतील कंत्राटदाराला निविदा मिळवून देण्यासाठी गैरप्रकार केला असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक श्री.प्रमोद आढाव व इतर स्थानिकांनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा सुमारास जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी वरील तक्रार अर्ज दिनांक ०३/११/२०१७ रोजी संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी हस्तांतरीत केला आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरण सविस्तर चौकशी करण्यासाठी अतिरिक्त संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेकडे सोपविण्यात आले आहे. पुढील चौकशी अतिरिक्त संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील गावांमध्ये पाणी शुध्दीकरण यंत्रणा नसल्याने दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(५७) * ९८५९७ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनामध्ये ७० टक्के गावांत पाणी शुद्धीकरण यंत्रणा नसल्यामुळे अनेक गावांतील रहिवाशांना दुषित पाणी प्यावे लागत असल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील काही गावांमध्ये पाणी शुद्धीकरण यंत्रणा आहेत परंतु त्याचा वापर होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील २ हजार ११९ पाण्याच्या नमुन्यांपैकी १२१ गावातील पाण्याचे नमुने दुषित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सांगली जिल्ह्यासह राज्यातील गावांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

सांगली जिल्हयामध्ये ९० ठिकाणी जल शुध्दीकरण केंद्राद्वारे पाणी शुध्द करुन पाणी पुरवठा केला जातो. ज्या ठिकाणी भुपृष्ठीय उद्भव धरण्यात येतो अशाच ठिकाणी जलशुध्दीकरण केंद्र उभे करावे लागते. ज्या ठिकाणी पाझर विहीर उद्भव धरुन नळ पाणी पुरवठा योजना राबवली जाते अशा ठिकाणी जल शुध्दीकरण केंद्र उभारण्याची आवश्यकता नसते, तर त्या ठिकाणी उद्भवाद्वारे उपलब्ध झालेले पाणी ब्लिचिंग पावडरचा योग्य प्रमाणात डोस देवून निर्जतुकिरण करुन पाणी पुरवठा केला जातो.

(२) होय हे खरे आहे.

तासगांव तालुक्यातील विज देयके अदा न केल्याने बंद पडलेल्या प्रादेशिक योजनांची जलशुध्दीकरण केंद्रे बंद असल्याने १४ गावांमध्ये पाणी शुध्दीकरणाची प्रक्रिया होत नाही. तथापी सदर ठिकाणी अस्तित्वातील इतर उद्भवाचे निर्जतुकिकरण करुन पाणी पुरवठा करणेत येतो.

(३) होय हे खरे आहे.

सांगली जिल्हयात माहे ऑगस्ट २०१७ मध्ये (सप्टेंबर २०१७ मध्ये प्राप्त अहवालानुसार) एकुण २३८८ पाणी नमुन्यांची जैविक तपासणी पाणी गुणवत्ता व सनियंत्रण आणि सर्वेक्षण विभागाकडून करण्यात आली होती. सदर तपासणीत १२१ गावातील १८२ ठिकाणचे पाणी नमुने दुषित असल्याचे आढळून आले होते.

(४) जिल्हा पाणी स्वच्छता मिशन कक्ष यांच्या मार्फत सर्व गटविकास अधिकारी, व आरोग्य विभागाकडून तालुका आरोग्य अधिकारी यांना याबाबत अवगत करण्यात आले होते. तालुका स्तरीय यंत्रणे मार्फत संबंधीत ग्रामपंचायतींना दुषित झालेल्या स्त्रोतांचे ब्लिचिंग पावडरने निर्जुतुकिकरण करुन पाणी नमुने फेर तपासणीसाठी पाठविण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. त्यानुसार संबंधित ग्रामपंचायतींनी दुषित स्त्रोतांचे शुध्दीकरण करुन पाणी नमुने फेरतपासणीसाठी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा व उपविभागीय प्रयोगशाळेकडे पाठविले होते. सदरचे नमुने तपासणीपश्चात योग्य असल्याचे आढळून आले आहेत.

तसेच शासन निर्णयानुसार पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची दोन वेळा पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर (माहे एप्रिल व ऑक्टोंबर, २०१७) स्वच्छता सर्वेक्षण मोहिम आरोग्य कर्मचारी व जलशुरक्षक यांचेमार्फत राबविण्यात आली आहे. माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये आरोग्य विभागामार्फत पाणी पुरवठा कर्मचारी व जलसुरक्षकांना पाणी शुध्दीकरणाबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.